Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# इंदिरा संत आणि समकालीन मराठी कविता

**प्रा. डॉ. रामलीला सुदामराव पवार**
**मराठी विभाग प्रमुख**
**एम.एस.एस.महाविद्यालय, तीर्थपुरी.**

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्यातील स्त्रीवादी कवितेच्या प्रांतात इंदिरा संत या श्रेष्ठ कवयित्री म्हणून मान्यता पावल्या आहेत. समकालीन मराठी साहित्याचा विचार केल्यास असे दिसते की, इंदिरा संत यांची काव्यदृष्टी शांता शेळके, अनुराधा पाटील, संजिवनी मराठे यांच्या पेक्षा भिन्न आहे. १९४० नंतरच्या काळात नवकवितेचे वारे वाहत असताना एक वेगळी भावोत्कट, संयमित शैली जपणारी कवयित्री म्हणून इंदिरा संत ओळखल्या जातात. काव्यलेखनातून काव्य प्रवाहात स्वत:ला झोकून देण्यात कवयित्री माहिर आहे. समकालीन मराठी काव्य लेखनाच्या प्रवाहात मर्ढेकरांनी आणलेली नवता आणि बोरकरांचे निसर्ग प्रेम यांच्या जोडीने इंदिरा संतानी 'आत्मसंवाद' साधत दु:खाचा आणि एकाकीपणाचा एक अत्यंत तरल आणि शोषिक सूर लावला जो मराठी रसिकांच्या मनाचा ठाव घेणारा ठरला.

**इंदिरा संत यांची वाङ्मयीन जडणघडण :-**

मराठीतील महत्वपूर्ण कवयित्री इंदिरा संत यांचा जन्म ४ जानेवारी १९१४ रोजी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंडी या गावी झाला. वडील गोपाळराव सरकारी नोकरीत असताना अकाली गेले.त्यानंतर वडिलांच्या मूळ गावी 'तवंदी'येथे काकांच्या देखरेखीत बालपण गेले. लहानपणीच पितृसुखाला पारख्या झालेल्या इंदिराबाई यांनी आईकडुन अनेक गोष्टी आत्मसात केल्या.तवंदी येथील बालपणीच्या आठवणी त्यांनी 'मृदगंध' या आत्मकथनात लिहिल्या आहेत. इंदिरा संत यांनी महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथून पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना कथा,कादंबऱ्याची गोडी लागली. एकीकडे कडक शिस्त आणि एकीकडे साहित्यीक स्वप्न सृष्टी यामुळे त्यांचा स्वभाव अंतर्मुख बनला.

इंदिरा संत यांना लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. घरामध्ये असलेली पौराणिक ग्रंथ, मासिक, वर्तमानपत्र वाचनाची सवय त्यांना जडली. शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी जाणिवपूर्वक काव्यवाचन केले.कवी यशवंत यांच्या 'गुलामाचे गाऱ्हाणे ' या कवितेपासून प्रेरणा घेऊन त्यांनी 'अनाथ ' ही कविता लिहिली. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना पहिल्यांदा त्या

आईपासून दूर राहिल्या त्यामुळे आईची वाटणारी ओढ,येणारी आठवण, आणि वाचण्यात आलेली कवी यशवंत यांची 'आई',माधव ज्युलियन यांची ' प्रेमस्वरूप आई' या कवितांच्या प्रेरणेने इंदिरा संत यांनी '/आई' कविता लिहिली. "'आई या विषयावर यशवंत,माधव ज्युलियन यांच्या कविता उत्कृष्ट आहेत,पण इंदिरा बाईंच्या काव्यातील भावनेची उत्कटता , कोमलता आणि सहजता फक्त जानपद ओवीतच सापडू शकेल अन्यत्र नाही"**१** कवी स्त्री गीते आणि ओव्या हा त्यांच्या आवडीचा खास प्रांत . स्वतः विषयी बोलताना त्या म्हणतात, "माझ्या ठिकाणच्या कवितेला जर कोणी जागे केले असेल तर ते जानपद ओवीनेच. या जानपद ओवीतले काव्य लहानपणापासूनच माझ्या मनाला मोहिनी घालत आहे. त्याचा आस्वाद घेता घेताच माझ्यातील काव्यशक्ती वाढीस लागली आहे. या छंदामुळेच ही जानपद गीते जमा करण्याची सवय मला जडली आहे" असे त्या सांगतात.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांची ना.मा.संत यांच्याशी ओळख झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. साहजिकच यांचे पडसाद घरात उमटले. घरात होणाऱ्या विरोधाला न जुमानता इंदिरा बाईंनी नारायण माधव संत यांच्याशी विवाह केला. ना.मा.संत देखील कवी होते. विवाहानंतर इंदिरा संत यांच्या वाचनाला आणि लेखनाला गती आली. त्याचा एकत्रित असा 'सहवास' नावाचा कवितासंग्रह १९४१ ला प्रकाशित झाला. यामध्ये त्यांच्या सफल प्रीतीचा सुखद आविष्कार करणारा कविता आहेत. सुखी संसाराचे फार दिवस त्यांच्या वाट्याला आले नाही. ना.मा.संत यांचे अकाली निधन झाले. पतीच्या अकाली निधनानंतर त्यांच्या जीवनात एक पोकळी निर्माण झाली. नंतरचे आयुष्य मुलांना सांभाळण्यात व शिक्षकी नोकरी करण्यांत गेले. या काळात आलेले एकाकीपण ,विरह, वेदना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि पर्यायाने त्यांच्या कवितेचा स्थायीभाव बनला. त्या कधीही बंडखोर झाल्या नाहीत उलट त्यांनी आपले दुःख पचवून आपल्या कवितेतून ते संयतपणे मांडले.

**इंदिरा संत यांची साहित्य संपदा :-**

. मराठी साहित्यातील हळव्या भावभावनांना शब्दबध्द करणाऱ्या इंदिरा संत या अत्यंत समृद्ध लेखिका आहेत. त्यांच्या कवितांमधून प्रामुख्याने स्त्री मन , निसर्ग आणि एकाकीपण अत्यंत तरलपणे उमटले आहे. इंदिरा संत यांनी मराठी साहित्यातील कविता या वाङ्मय प्रकारात प्राधान्याने लेखन केले असले तरी त्यांनी कथालेखन, ललितलेखन, ओवी गीतांचे संपादन, शिशु गीतांचे संपादन इत्यादी साहित्य प्रकारात लेखन केले आहे.

इंदिरा संत यांच्या साहित्याचे मुख्य वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे:

१. **कवितासंग्रह** (काव्यसंपदा)

इंदिरा संत यांची खरी ओळख त्यांच्या कवितांमुळेच आहे. त्यांनी मानवी भावविश्व, विशेषतः विरहाच्या आणि प्रेमाच्या छटा अतिशय संयमित भाषेत मांडल्या.

सहवास (१९४०): हा त्यांचा पहिला महत्त्वाचा कवितासंग्रह.

शेला (१९५१): या संग्रहाने त्यांना खरी लोकप्रियता मिळवून दिली.

मेंदी (१९५५): निसर्ग आणि मानवी भावनांचा सुरेख संगम.

मृगजळ (१९५७): स्त्रीच्या मनातील व्याकूळता यात प्रकर्षाने दिसते.

रंगबावरी (१९६४): या संग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

बाहुल्या (१९७२): स्त्री जीवनातील विविध अवस्थांचे चित्रण.

गर्भरेशीम (१९८२): परिपक्व अनुभवांची मांडणी. वंशकुसुम (१९८४), निराकार(२०००) इंदिरा संत यांचा काव्यप्रवास हा सहा दशकांचा आहे.

नारायण संत आणि इंदिरा संत या पती-पत्नींनी मिळून १९४० मध्ये **'सहवास'** नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला होता, जो त्यांच्या साहित्यिक प्रवासाचा श्रीगणेशा मानला जातो.

२. **कथासंग्रह**

कवितेइतकीच त्यांची कथाही आशयसंपन्न आहे. कौटुंबिक नातेसंबंध आणि मध्यमवर्गीय जीवन त्यांच्या कथेतून येते.

'श्यामली' ,'कदली','चैतू' (हा विशेषतः गाजलेला संग्रह आहे)

**३.ललितलेख संग्रह.** 'मृदगंध','फूलवेल' हे दोन आत्मकथनात्मक ललितलेख संग्रह आहेत.

**४. संपादन** 'मालनगाथा ' हा संपादित स्वरूपाचा ग्रंथ आहे.

**५. बालसाहित्य**

लहान मुलांसाठीही त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत लेखन केले आहे. 'अंगणतळ','मामाचा वाडा' ही त्यांची लक्षवेधक पुस्तके सांगता येतील.

**इंदिरा संत आणि समकालीन मराठी कविता -**

इंदिरा संत यांनी स्वतःवर मराठी काव्य प्रवाहातील पूर्वकालीनांची किंवा समकालीनांची बंधने स्विकारलेली आढळत नाही. त्यांच्या काव्यलेखनाला जीवनानुभवाचा झालेला स्पर्ष शब्दवैभव मराठी काव्यरसिकाला भारावून टाकणारे आहे. इंदिरा संत यांनी स्त्री जीवनाचे विविध पैलू व्यक्त करणारी कविता लिहिली इंदिरा संत यांची कविता समकालीन आहे. ग्रामीण आणि स्त्रीवादी यांसारख्या नव्याने आपले स्थान निर्माण करणाऱ्या निश्चित करणाऱ्या चळवळी इंदिराबाईंनी

स्वतः अनुभवल्या. स्वतः च्या कक्षा रुंदावत नेणाऱ्या मराठी कवितेच्या प्रवाहात इंदिराबाई स्वतःच्या नव्या वाटा शोधत होत्या. इंदिरा संत नवकाव्य चळवळीच्या प्रभावाखाली आल्या, पण त्यांनी स्वतःची एक स्वतंत्र, भावप्रधान आणि स्त्री-केंद्रित शैली विकसित केली. कवितेचा स्वतंत्र असा वेगळा ठसा त्यांच्या समकालीनांच्या कवितेइतकाच स्पष्ट आणि प्रभावी आहे त्यात त्यांनी कोणत्याही प्रकारचा अट्टाहास केलेला नाही. अगदी 'सहवास' काव्यसंग्रहापासून झालेली सुरुवात पाहिली तरी हे प्रकर्षाने जाणवते. 'शेला' या काव्यसंग्रहाने त्यांच्या कवितेला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले आहे. पती निधनानंतर काही काळ त्यांचे लेखन थांबले होते. नंतर आलेले लेखन मात्र वेगळे वळण घेऊन आले आहे.

इंदिरा संत यांच्या समकालीन कविंसोबत उदा. कुसुमाग्रज,बा.भ.बोरकर, बा.सि.मढे मर्ढेकर,पु.सि.रेगे तसेच पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके, अनुराधा पोतदार इत्यादी या सर्व समकालीन कविंसोबत इंदिराबाईंनी आपल्या समकालीन काव्यलेखनाने मराठी काव्य वर्तूळात आपले स्वतंत्र असे स्थान आखून ठेवले आहे. इंदिरा संत यांचे सर्वात मोठे वेगळेपण म्हणजे त्यांची मौन भाषा. त्या शब्दांपेक्षा शब्दांमधील शांततेतून बरेच काही बोलून जातात. 'शेला', 'मेंदी','मृण्मयी' यांसारख्या संग्रहातून त्यांनी मराठी कवितेत एक प्रकारचे 'लिरिसिझम' आणले, जे त्यांच्या समकालीन कवींपेक्षा अधिक गडद होते.

इंदिरा संत यांनी रविकिरण मंडळाच्या काळात रविकिरण मंडळातील इतर कविच्या वळनाचे काव्यलेखन केले आहे. परंतु कोणाचे अनुकरण केले नाही.त्यांच्या काव्यलेखनाचे वेगळेपण मांडताना डॉ.उषा देशमुख म्हणतात, "अंतर्मुखता हा इंदिराबाईंच्या कवितेचा प्राण असला तरी, प्रवासाच्या वळणातून काही वेळा त्यांचे कविता बहिर्मुख होत जाते. या कवितेला तिचा म्हणून एक स्वतंत्र पिळ आहे, तिचे म्हणून आकाश आहे. नंदनवन आहे.त्यांच्या कवितेचे स्वतंत्र विभृत आहे.म्हणून त्यांची कविता वेगळेपण घेऊन येते. कवितेतील स्त्रीस्वभाव आणि विरहभाव खास स्त्रीशी निगडित आहे. समकालीन कवी कवयित्रींचे अनुकरण ही कविता करत नाही"३ मराठी काव्यलेखनाच्या प्रवाहामध्ये अनेक स्थित्यंतरे घडत गेली परंतु इंदिरा संत यांच्या काव्य लेखनाला कोणत्याही प्रकारची बाधा झाली नाही. कवितेच्या स्थित्यंतरा संदर्भात प्रा रमेश तेंडुलकर लिहितात की, "भावनेची उत्कटता, सहजस्फूर्त आविष्कार वृत्तीच्या अंतर्मुखकतेकडे असलेला कल आणि त्याला साजेशी भावगर्भ शब्दकळा, शब्दांची काटकसर असलेली शैली आणि आटोपशीर रचनाबंध हे विशेष इंदिराबाईच्या कवितेला मराठी कवितेत स्वतंत्र स्थान निर्माण करण्यासाठी सहयोगी ठरते आहे"४ नवकाव्याच्या काळात इंदिरा संत यांची विशुद्ध भावकविता तिच्या वेगळेपणामुळे प्रभावी ठरत आहे. एकलेपणा विरह, दुःख या सर्वांना व्यापणारी ही कविता असली तरी ती दुःखाने काळवंडलेली नाही.हे तिचे वैशिष्ट्य आहे. निसर्ग आणि वैयक्तिक भावना यांची सहजसुंदर समरसता साधली जाते. उदा.

**"ही निळी पांढरी शरदातील दुपार तापल्या दुपार ऊन तिचे हळुवार**
**दिस भरलेली ही काय तरी गर्भार टाकीत पावले ही चाले रम्य दुपार"**

किंवा

**"सहज सहज टाकून गेलास ओजंळीमध्ये**
**एक ऋणाचा क्षण एका... जन्मासाठी"** यांसारख्या शब्दांकळांच्या माध्यमातून स्त्रीच्या भावजगताला नवे आयाम देत होत्या. देण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.

**इंदिरा संत यांच्या कवितेतील वैविध्य**

इंदिरा बाईंची कविता एका सुरात गाणारी वाटली तरी त्यात सूक्ष्म वैविध्य आढळते.

**निसर्ग प्रतिमांचा वापर:** त्यांच्या कवितेत निसर्ग हा केवळ पार्श्वभूमी म्हणून येत नाही, तर तो त्यांच्या मनःस्थितीचे प्रतीक म्हणून येतो. 'पानगळ', 'ऊन', 'पाऊस', आणि विशेषतः 'झाड' या प्रतिमा त्यांच्या एकाकीपणाला व्यक्त करण्यासाठी येतात.

'मृगजळातून विहारताना, एकच होते सत्य.. माझे मलाच अनोळखी, असे एक रूप.'

विरह आणि सोशिकता: त्यांच्या कवितेतील 'विरह' हा आरडाओरडा करणारा नाही. त्यात एक प्रकारची भारतीय स्त्रीची सोशिकता आहे. त्या दुःखाचे उदात्तीकरण करत नाहीत, तर दुःखाला सखी मानून जगतात.

**स्त्री जाणिवा:** तत्कालीन पुरुषप्रधान साहित्यात इंदिरा संतांनी स्त्रीच्या मनातील अत्यंत नाजूक कोपरे उलगडले. घर, अंगण, तुळस आणि खिडकीतून दिसणारे आकाश या परिघातून त्यांनी स्त्रीचे विश्व मांडले. इंदिरा संत यांच्या अनुभवाची जाणीव स्त्रीनिष्ठतेशी जुळलेली आढळते. स्त्रीत्वाच्या जाणिवेनेच प्रामुख्याने त्या लेखन करतांना आढळतात. यासंदर्भात डॉ सुनिता जोशी सांगतात की, "इंदिराबाईंची कविता स्त्रीत्वाने बहरलेली असली तरी,ती एका स्त्रीने लिहलेली कविता असली तरी, ती केवळ 'स्त्री'चीच स्त्रीपुरतीच मर्यादित कविता नाही.तशी ती असती तर 'आधुनिक मराठी भाषेतील स्त्रीगीते' असेच तिचे वर्णन करावे लागले असते. इंदिराबाईंच्या कवितेचे आव्हान कितीतरी व्यापक, कोणत्याही अभिजात कलाकृती प्रमाणे जीवनाच्या मुलभूत प्रश्नांना भिडणारे आहे"५ इंदिरा संत यांची कविता त्यांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी वलय निर्माण करणारी आहे असा देखील आरोप त्यांच्यावर केला जातो. खरं तर स्वतः च्या भावविश्वा बरोबरच बालकांच्या भावविश्वाला देखील महत्व त्यांनी दिले आहे. 'रंगबावरी' या कवितासंग्रहापासून त्यांच्या कवितेला नवी झळाळी प्राप्त झाली. नंतरच्या काळातील कवितेत (उदा. गर्भरेशिम) एक प्रकारची गूढता आणि तत्त्वज्ञानाची झालर दिसून येते. इंदिरा संत यांच्या काव्यात काळानूरूप बदल झालेला आढळतो. तब्बल सहा-सात दशके इंदिराबाईंनी एकनिषठतेने काव्यलेखन केले. त्यांचे काव्यलेखन शतकानुशतके मराठी कवितेलाच नव्हे तर मराठी काव्य रसिकांना देखील प्रेरणा देणारे आहे. एकाच विषयाला विविधांगी कौशल्य पूर्ण पध्दतीने आविष्कृत करण्याची पायवाट इंदिराबाईंनी मराठी कवितेत निर्माण केली.

इंदिरा संत यांच्या कवितेचे वाङ्मयीन मुल्यमापन :-

इंदिरा संत ज्या काळात लेखन करत होत्या त्या काळात मराठी कवितेत अनेक स्थित्यंतरे घडत होती. प्रत्येक स्थित्यंतरामध्ये इंदिरा संत यांची कविता स्वतःचे स्थान निर्माण करत होती. आपल्या कवितेविषयी त्या म्हणतात, "कविता हा माझ्या लेखनाचा आणि जगण्याचा गाभा आहे." निसर्ग कविता,प्रेमकविता ,सामाजिक कविता, वात्सल्य भाव व्यक्त करणारी कविता, पतीच्या निधनानंतर विरहाची कविता, स्त्रीयांच्या व्यथा वेदना मांडणारी कविता अशा विविध विषयांवर त्यांनी कविता लिहिली आहे.

समकालीन मराठी कवींशी तुलना करता इंदिरा संतांचे स्थान वेगळे ठरते. ज्या काळात बा. सी. मर्ढेकर यांनी जीवनातील वैफल्य आणि यांत्रिकतेवर कोरडे ओढले, कुसुमाग्रजांनी ओजस्वी सामाजिक कविता लिहिल्या, आणि बा. भ. बोरकरांनी निसर्ग व सौंदर्याची उधळण केली; त्या काळात इंदिरा संतांनी 'शुद्ध भावकविता' जिवंत ठेवली. त्यांच्या कवितेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'अलंकारांचा अभाव'. त्या साध्या, रोजच्या वापरातील शब्दांतून गहन अर्थ निर्माण करतात. त्यांची शैली संवादात्मक आणि थेट हृदयाला भिडणारी आहे.

संयत भावना: दुःख व्यक्त करताना तोल जाऊ न देणे, हे त्यांच्या कवितेचे वाङ्मयीन यश आहे. समीक्षकांच्या मते, "इंदिरा संतांची कविता म्हणजे अश्रूंचा एक थेंब आहे, जो गालावरून ओघळला आहे पण जमिनीवर पडलेला नाही. इंदिरा संत यांच्या काव्याचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या लेखनाचा विषय सुख असो की दुःख असो की ,प्रीतीभावना असो पती निधनाचा विरह असो अथवा संसारी जीवनातील एकलकोंडेपणा असो प्रत्येक भावभावनांचे कवितेतून होणारे अविष्करण होत असतांना इंदिराबाईंनी निसर्गाची व त्यातील प्रतिमांची संगत कोठेही सोडलेली आढळत नाही. निसर्ग आणि प्रीती यांच्या एकात्म अनुभुतीने वेढलेले त्यांचे भावविश्वातून बाहेर पडण्याचा त्या प्रयत्न करतात.

**समारोप :-**

इंदिरा संतांच्या लेखनात काही खास गोष्टी नेहमी जाणवतात. त्यांच्या कवितांत झाडे, फुले, पाऊस आणि ऋतुचक्र हे केवळ पार्श्वभूमी नसून ते मानवी भावनेचे भाग बनून येतात. दुःख किंवा विरह मांडताना कुठेही आरडाओरडा न करता अत्यंत मृदू आणि संयत शब्दांत त्या भावना मांडतात. इंदिरा संत यांची कविता ही काळाच्या ओघात जुनी न होणारी आहे. जोपर्यंत मानवी मनात प्रेम, विरह आणि एकाकीपणा या भावना आहेत, तोपर्यंत इंदिरा संतांची कविता प्रासंगिक राहील. समकालीन मराठी कवितेच्या कोलाहलात आपली 'मृदू पण स्पष्ट' नाममुद्रा उमटवणारी ही कवयित्री मराठी साहित्याचे एक 'गर्भरेशमी' लेणे आहे.

**निष्कर्ष:-**

१) १९४० पासून मराठी कवितेच्या प्रवाहामध्ये अनेक जेष्ठ कविंसोबत इंदिरा संत यांनी काव्यलेखन केले आहे.

२) भारतीय स्त्रीचे सोशिकपण, तिचे घरपण आणि तिची आंतरिक ओढ हे त्यांच्या साहित्याचे केंद्रस्थान राहिले आहे.

३) पतीच्या निधनानंतर आलेले एकाकीपण ,विरह, वेदना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि पर्यायाने त्यांच्या कवितेचा स्थायीभाव बनला. त्या कधीही बंडखोर झाल्या नाहीत उलट त्यांनी आपले दुःख पचवून आपल्या कवितेतून ते संयतपणे मांडले.

४) इंदिराबाईंच्या व्यक्तिमत्वाप्रमाणेच त्यांच्या कविता अत्यंत आत्मनिष्ठ व आत्मकेंद्री आहेत. दुसऱ्याचे दुःख आणि भावना त्यांनी स्वतःच्या प्रकृतीत समावून घेतल्या आहेत. अत्यंत संवेदनशीलतेने त्यांनी स्त्री मनाचे अंतरंग कवितेत टिपले आहे.

५) इंदिरा संत यांच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाची चौकट लहान आहे. त्या चौकटीत कवीता लिहिताना त्यांनी स्वतःला काही मर्यादा घालून घेतलेल्या आहेत.

६) इंदिरा संत या प्रसिद्धीपासून अलिप्त राहिल्या. काव्य निर्मितीच्या संदर्भात कोणी मार्गदर्शनाची अपेक्षा केल्यास त्या आस्थेने ते करत असत.

७) इंदिरा संत यांची कविता ही काळाच्या ओघात जुनी न होणारी आहे. जोपर्यंत मानवी मनात प्रेम आहे विरह आणि एकाकीपण या भावना आहेत तोपर्यंत इंदिरा संतांची कविता प्रासंगिक राहील.

८) भारतीय स्त्रीचे सोशिकपण, तिचे घरपण आणि तिची आंतरिक ओढ हे त्यांच्या साहित्याचे केंद्रस्थान राहिले आहे.

इंदिरा संत यांनी तब्बल साठ वर्षे (सहा दशके) काव्यलेखन करून मराठी कवितेला एक स्वतंत्र उंची प्राप्त करून दिली.

**संदर्भ :**

१) काळे के.नारायण : महाराष्ट्र साहित्य पत्रिका,वर्ष १४, 'सहवास'परिक्षण ' जुलै १९४१,पृ.२४.

२) इंदिरा संत: : 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', एप्रिल १९४६, 'कविच्या अंतरंगात',पृ.११८

३) डॉ.देशमुख उषा: 'अशी आरास काव्यफूलांची गर्भरेषमी', ७९ वे आ.भा.सा.सं.२००० बेळगाव (अप्रकाशित).

४) प्रा.रमेश तेंडुलकर: संपा मृण्मयी सुविचार प्रकाशन, पुणे,१९८१.

५) डॉ जोशी सुनिता : 'इंदिरा संत यांची कविता: एक आकलन', राजहंस प्रकाशन पुणे,१९९४,पृ.क्र.२२३.